# पहिले महायुध्द

Presented By

Dr.Vinayak Wasu

महायुद्ध, पहिले : जागतिक स्वरूपाचे हे पहिले महायुध्द १ ऑगस्ट १९१४ रोजी सुरू झाले व ११ नोव्हेंबर १९१८ रोजी संपले. आधुनिक काळातील युध्दांची कारणपरंपरा प्रदीर्घ असते मात्र ते एखादया विवक्षीत घटनेमुळे भडकते. पहिल्या महायुध्दाची कारणपरंपरा संक्षेपाने पुढीलप्रमाणे होती : या युध्दाची ठिणगी जरी ऑस्ट्रिया–हंगेरी साम्राज्याचा युवराज फ्रान्सिस फर्डिनंड याच्या खुनाने पडली तरी खरा संघर्ष जर्मनी व शेष यूरोप यांच्यातच होता.

१८७० पर्यंत जर्मनीत अनेक स्वतंत्र संस्थाने होती तथापि जनतेमध्ये एकराष्ट्रीयत्वाची तीव्र भावनादेखील होती. १८७०-७१ ह्या ⇨फ्रँको-प्रशियन (जर्मन) युध्दानंतर प्रशियाचा पंतप्रधान बिस्मार्क याने ऑस्ट्रिया सोडून इतर जर्मन संस्थानांचे एकत्रीकरण बनविण्यात यश मिळविले. त्याने प्रशियाच्या राजाच्या नेतृत्वाखाली आधुनिक जर्मनीची स्थापना केली व प्रशियाचा राजा हा जर्मनीचा बादशहा ऊर्फ कैसर बनला. जर्मन राष्ट्राच्या निर्मितीने ब्रिटन, फ्रान्स व रशिया यांना एक बलवान प्रतिस्पर्धी निर्माण होऊन यूरोपातील बलसमतोल अस्थिर झाला. जर्मनीलाही साम्राज्य-विस्तार करण्याची महत्त्वकांक्षा होतीच पण जर्मनीच्या निर्मितीपूर्वीच आफ्रिका व आशिया यांचा बराच भूभाग वरील तिघांनी बळकावलेला होता. जर्मनीनेही त्यांच्या मागोमाग आफ्रिकेतील काही प्रदेश, चीनमधील काही बंदरांत इतर यूरोपीय साम्राज्यवादी राष्ट्रांच्या धर्तीवर विशेषाधिकार व पॅसिफिक महासागरातील काही बेटे मिळविली

पुढे जर्मनीत मोठ्या प्रमाणात उद्योगधंदे सुरू झाले आणि त्याबरोबर ब्रिटन व जर्मनी यांच्यामध्ये व्यापारी स्पर्धाही सुरू झाली. यूरोपातील राजकरणातदेखील आपल्याला धुरीणत्व (हेगिमनी) मिळावे, असे जर्मनीस वाटू लागल्याने जर्मनीची फ्रान्स व रशियाशी चढाओढ सुरू झाली. जर्मनीत लष्करी अधिकारीवर्गाचा ज्रमनीच्या धोरणावर प्रभाव होता. जर्मनीला फ्रान्स व रशिया हेच दोन प्रमुख शत्रू वाटत असल्याने जर्मन सेनाधिकाऱ्यांनी या दोन्ही देशांशी युध्द झाल्यास त्याविरूध्द करावयाच्या लष्करी कारवाईच्या योजना तयार ठेवली होती.

ऑस्ट्रियाच्या ताब्यात पोलंडचा काही भाग, हंगेरी व बाल्कन प्रदेशातील काही भाग होता. एकोणीसाव्या शतकात ऑटोमन साम्राज्यातील स्लॉव्ह वांशिक व भाषिक प्रदेश रशियाच्या साहाय्याने व प्रोत्साहनाने स्वतंत्र बनले होते. बाल्कन संस्थानातील लोक व रशियन लोक एकाच स्लॉव्ह वंशाचे आणि धर्मपंथाचे (ग्रीक अथवा ईस्टर्न ऑर्थोडॉक्स चर्च) होते.


सेनाबळ व युध्दसज्जता : ग्रेट ब्रिटन वगळता सर्व युध्दखोर राष्ट्रांच्या सेना या सक्तीसैनिकांच्या (काँसक्रिप्ट) सेना होत्या फ्रान्सची सक्तीसैनिक-भरतीपध्दती जर्मनीच्या पध्दतीपेक्षा अकार्यक्षम होती.

जर्मन सेना ही शस्रास्रे व प्रशिक्षण दृष्ट्या १९१४ साली सर्वांत श्रेष्ठ प्रतीची होती. सांग्रामिक साहित्य-उत्पादनासाठी जर्मनीची औद्योगिक संघटना भक्कम होती. आक्रमणशील युध्दखोरतेबरोबर संरक्षणात्मक युध्द लढविण्याचे शिक्षण जर्मन सैनिकांना दिले जात असे.

एकंदर युध्दकार्यक्षमतेच्या दृष्टीने फ्रान्सची सेना दुसऱ्या क्रमांकाची होती तथापि आक्रमकवत्तीनेच युध्द लढविण्यावर तिचा भर होता. संरक्षणात्मक अंगाकडे बहुतांश दुर्लक्ष होते. रणांगणीय ⇨तटबंदी व ⇨मशीनगनचा वापर संरक्षणाच्या दृष्टीने करण्यात फ्रेंच सेना

**श्लीफेन योजनेची पाश्वभूमी : श्लीफेन पूर्वी मोल्तके हा जर्मन जनरल स्टाफ-प्रमुख होता. ऑस्ट्रिया–जर्मनी (१८६६) आणि**

**फ्रान्स–प्रशिया (१८७०) या युद्धातील जर्मन विजयांच्या अनुभवावरून त्याने खालीलप्रमाणे निष्कर्ष काढले : (१) पुढील युद्धात जर्मनीला मागीलप्रमाणे यश मिळविणे शक्य नाही (२) पुढील युद्धात फ्रान्सवरील चढाईत रशिया पूर्वीप्रमाणे तटस्थ राहणार नाही (३) जर्मनीची पश्चिम आघाडी फ्रान्सच्या चढाईला दुर्भेद्य असल्याने रशियाचे आक्रमण बहुतांश जर्मन सेना परतवू शकेल (४) सर्व यूरोप पादाक्रांत करण्यास जर्मनी समर्थ नाही आणि तसे करण्याची आवश्यकताही नाही. जर्मनी सुरक्षित राहिले म्हणजे पुरे झाले (५) आगामी युद्ध २० वर्षेही चालेल. असे त्याचे मत.**




सूची : मूळ श्लीफेन योजना; प्रत्यक्ष आक्रमण

**महायुद्ध, पहिले.**
**पश्चिम आघाडी : श्लीफेन योजना.**


फ्रान्सची युद्धयोजना : जनरल व्हिक्टर मीशेलची योजना (सोळावी योजना) ती अशी : जर्मन चढाई ही अ‍ॅल्सेस-लॉरेन या दुर्गम प्रदेशातून असंभवनीय वाटल्यामुळे तटस्थ बेल्जियमच्या प्रदेशातूनच जर्मनी आक्रमण करील या गृहीतकृत्यावर आधारभूत होती. म्हणून जर्मनीची चढाई होण्यापूर्वीच बेल्जियमची तटस्थता भंग करूनही जर्मनीवर हल्ला चढवावा, अशी ही मीशेल योजना होती. मीशेलची योजना जर्मनीच्या पथ्यावर पडणारी होती. कारण त्यामुळे फ्रान्स आक्रमण ठरून जर्मनीला संरक्षणासाठी युद्ध करावे लागेल, असे जगाने म्हटले असते. मिशेलची योजना नामंजूर झाली. मीशेलला पदच्युत करण्यात आले. त्याच्या जागी आलेल्या जनरल झॉफ्रने एक मध्यममार्गी योजना (सतरावी योजना) आखली. ती पुढीलप्रमाणे होती : त्योंव्हिल–मेट्स या प्रदेशाच्या उत्तर व दक्षिण बाजूंनी अ‍ॅल्सेस-लॉरेनच्या प्रांतावर द्विमुखी हल्ला चढविणे. त्याबरोबरच जर्मनीने बेल्जियममधून जर आक्रमण केलेच, तर तिकडे दोन फ्रेंच सेना प्रतिकारासाठी पाठविणे, अशी ही झॉफ्र योजना होती

रशियाची योजना : ऑस्ट्रिया व जर्मनी यांच्या युद्धघोषणेमुळे रशियाला एकाच वेळी दोन आघाड्यांवर चढाया करणे भाग पडले. यासाठी त्वरेने सक्तीसैनिक भरती करण्यास रशिया अक्षम होते त्यामुळे पूर्व प्रशियात मार खावा लागला. भरीला भर रशियायी उच्च युद्धनेते आपआपसांत भांडणारे व युद्धनेतृत्वात निकृष्ट होते. ऑस्ट्रियाच्या ढिलेपणामुळे गॅलिशियात थोडेफार विजय रशियास मिळाले.

रशियाच्या सेनेत धैर्यवान, पण मवाळ व काटक शेतकरी सैनिक बहुसंख्येने होते. सेनेत शस्त्रास्त्रे व दारूगोळा यांचा तुटवडा होता. उच्च सैनिकी नेतृत्व बेफिकीर व अकार्यक्षम होते.

युद्धहेतू : या महायुद्धात भाग घेण्याचे युद्धहेतू कोणत्याही युद्धमान राष्ट्राने सुस्पष्टपणे जाहीर केले नव्हते. स्वराष्ट्र संरक्षणासाठी आपण युद्धात पडलो म्हणून युद्धात सैनिकी विजय मिळविणे हे उद्दिष्ट असल्याचे प्रत्येकाचे म्हणणे होते. युद्धाच्या अखेरपर्यंत व्यावहारिक युद्धहेतू पुढीलप्रमाणे होते : (१) फ्रान्स–स्वराष्ट्रीय प्रदेशातून (१८७० साली जर्मनीने बळकाविलेला ॲल्सेस–लॉरेन प्रांतधरून) जर्मनीला हाकलून लावणे (२) ब्रिटन–बेल्जियमची जर्मनपाशातून मुक्तता करणे (३) रशिया–एक प्रमुख सैनिकबलयुक्त राष्ट्र म्हणून जगणे (४) जर्मनी–ऑक्टोबर १९१८ पर्यंत, पादाक्रांत प्रदेश ताब्यात ठेवणे व बेल्जियम आणि ईशान्य फ्रान्सवर नियंत्रण ठेवणे (५) बाल्कन प्रदेशावर जर्मन प्रभुत्वाची छाया घालणे. किंबहूना संपूर्ण यूरोपवर जर्मनीचे प्रभूत्व मिळविणे. पुढे या हेतू उद्दिष्टांमध्ये जर्मनीला किरकोळ फेरफार करावे लागेल.

युद्धघटना : युद्धाचा आरंभ १ ऑगस्ट १९१४ रोजी झाला. या महायुद्धातील युद्‌यमान राष्ट्रांचे दोन तट होते, ते असे. मध्यवर्ती राष्ट्रीय तट : जर्मनी, ऑस्ट्रिया-हंगेरी, या तटात नोव्हेंबर १९१४ मध्ये तुर्कस्थान व ऑक्टोबर १९१५ मध्ये बल्गेरिया सामील झाले. दोस्त राष्ट्रीय तट : रशिया, फ्रान्स, ग्रेट ब्रिटन, या तटात मे १९१५ मध्ये इटली, ऑगस्ट १९१६ मध्ये रूमानिया व एप्रिल १९१७ मध्ये अमेरिका सामील झाले. यांच्याशिवाय बेल्जियम, सर्बीया, जपान, इटली, ग्रीस, पोर्तुगाल, माँटनीग्रो ही राष्ट्रे या तटात होती. हिंदुस्थान ब्रिटिशांकित असल्याने ब्रिटनबरोबरच त्याला युद्ध लढावे लागले. हे युद्ध मर्यादित राहील व काही आठवड्यांतच आटोपेल हा होरा साफ चुकून ते चार वर्षे चालले व ११ नोव्हेंबर १९१८ रोजी युद्धविराम करण्यात आला. मध्यवर्ती तटाचा पराभव झाला.


महायुद्ध, पहिले.
गलिपलीची मोहीम
गलिपली
तुर्कस्तान
लीमान फोन झान्डर्स
सूल्व्हा भूशिर
सूल्व्हा उपसागर
सॉल्ट सरोवर
निब्रुनेस भूशिर
चॉकोलेट टेकडी
स्टॉपफोर्ड
(वर्डवुड) ॲन्झॅक
गाबाटेप
ॲन्झॅक उपसागर
हॅमिल्टन
लीमान फोन झान्डर्स
हंटर-वेस्टन
क्रीथ्या
हेलास भूशिर
सेडुलबार
कुमकाले
मार्मारा समुद्र
चानाकाले
किलीद बार
सुरुंगक्षेत्र
दार्दानेल्स सामुद्रधुनी
सूची :
दोस्तांचे नाविक हल्ले : १८ मार्च व २५ एप्रिल १९१५.
ब्रिटिश सेनेचे पदार्पण : २५ एप्रिल १९१५.
ब्रिटिश सेना ठाण मांडते : २५ एप्रिल १९१५.
सूल्व्हा उपसागरात ब्रिटिश सेनेचे पदार्पण : ७ ऑगस्ट १९१५.
ब्रिटिश सेनेची कमाल आगेकूच : १४ ऑगस्ट १९१५.
मूळ उद्दिष्टे.

Thanku You